नि.दि.दा.नं. ८४१/२०१७

**निशाणी क्र. ३२**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. २.</u>**

मी शपथेवर निवेदन करतो की,

| | | | |
|---|---|---|---|
| माझे नांव | : **पुष्पांजली रघुनाथ पाडुळे,** | | |
| माझे वय | : ३१ वर्षे | व्यवसाय | : नोकरी, भूमापक |
| राहणार | : भूमि अभिलेख कार्यालय | तालुका | : धाराशिव |
| जिल्हा | : धाराशिव. | | |

**<u>सरतपासणी वादी तर्फे विधीज्ञ श्री. के. एस. ओव्हाळ यांचेकडुन शपथेवर सुरु</u> –**

१. मी सन २०१७ मध्ये उप अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, कळंब येथे भूमापक या पदावर कार्यरत होते. उप अधिक्षक, भूमि अभिलेख, कळंब यांचे आदेशा प्रमाणे मी मौजे कोथळा येथील शेत गट क्रमांक ७१ ची मोजणी केलेली आहे. सदर मोजणी करण्यांपूर्वी मी संबंधीत शेतकरी, सहधारक व लगतचे कब्जेदार यांना नोटीसा पाठवल्या होत्या व त्या प्रमाणे प्रस्तावित मोजणीची तारीख कळविली होती. सदर मोजणीची तारीख दिनांक २०/०३/२०१७ अशी निश्चीत करण्यांत आली होती त्या प्रमाणे मीमोक्यावर गेले होते. ज्या गटाची मोजणी करावयाची आहे त्या गटाचा ७/१२ उतारा मी पाहिला होता. मी प्रत्यक्ष मोक्यावर गेली त्यावेळी मी सदर गट क्रमांक ७१ मधील सहधारकांची मोक्यावर असलेली वहिवाट निश्चीत केली. त्यानंतर इटीएस मशीनच्या सहाय्याने सर्वे क्रमांक ७ गट क्रमांक ७१ ची मोजणी करण्यांत आली. त्या बाबत मोक्यावरच पंचनामा करण्यांत आला. त्यामध्येच आम्ही हद्दी खुणा निश्चीत करण्यां बाबत पुढील तारीख निश्चीत केली. त्यानंतर मी कार्यालयात येवून सदर सर्वे क्रमांकाचे मुळ अभिलेख काढले. इटीएस मशीनच्या सहाय्याने जी मोजणी शिट प्राप्त झाली ती मोजणी शिट त्या मुळ अभिलेखावर ट्रेस पेपरच्या सहाय्याने बसवण्यांत आली. त्या प्रमाणे मोजणी शिट अ तयार करण्यांत आली व त्यावरुन मोजणी शिंट ब व क तयार करण्या त आली. त्यानंतर दिनांक २७/०३/२०१७ रोजी प्रत्यक्ष जाय मोक्यावर जावून त्या गटाच्या मुळ अभिलेखाप्रमाणे येणा–या हद्दी खुणा दाखवून त्या बाबतचा सविस्तर पंचनामा केला. आता मला अभिलेखावरील मोजणी नकाशाची क प्रत दाखवण्यांत आली. ती आमचे अभिलेखातील मुळ मोजणी शिट अ प्रती प्रमाणे तंतोतंत बरोबर आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यावर माझी सही आहे. त्यास निशाणी ३३ देण्यांत येते. सदर मोजणीत गट क्रमांक ७० च्या धारकाने गट क्रमांक ७१ मधील ६ आर क्षेत्रावर अतिक्रमण केल्याचे निष्पन्न झाले होते.

**<u>उलट तपासणी प्रतिवादी तर्फे विधिज्ञ श्री. बी.एन.लोमटे यांचेकडुन</u>**

. सन २०१३ पासून मी भूमि अभिलेख कार्यालयात भूमापक म्हणून कार्यरत आहे. मी तंत्रनिकेतन महाविद्यालयातून अभियांत्रीकी विभागातून संबंधीत विषयात पदविका प्राप्त केलेली आहे. मोजणीचे काम हे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ प्रमाणे चालत असते. हे म्हणणे खरे आहे की, मोजणी संदर्भात महाराष्ट्र शासनाचे मोजणी संहिता म्हणून नियम असलेली पुस्तीका आहे. सदर पुस्तीकेचा मी अभ्यास केलेला आहे.

२. विषयांकित मोजणी संदर्भात संजय उत्तम शिंदे यांनी मोजणीकरीता अर्ज दिला होता. सदर अर्जानुसार गट क्रमांक ७१ ची तातडीने मोजणी करुन हद्द कायम करण्यांसंदर्भात विनंती करण्यांत आली होती. गट क्रमांक ७१ चे ७/१२ उता–यावर संगिता संजय शिंदे, सविता सिध्देश्वर शिंदे व संजय उत्तम शिंदे यांची नांवे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्या तिघांचे क्षेत्र वेगवेगळे आहे. हे म्हणणे खरे आहे की, मोजणी नकाशा मध्ये त्या तिघांचे क्षेत्रांबाबत नमुद करण्यांत आलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर गटामध्ये त्या तिघांचे नेमके क्षेत्र कुठे आहे ते मला सांगता येणार नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की, मोजणी संहिते नुसार मोजणी करण्यां अगोदर धारकांना व लगतचे शेतक–यांना १५ दिवसाची आगाउ नोटीस देणे आमचेवर बंधनकारक आहे. मोजणी अर्जा प्रमाणे गट क्रमांक ७१ चा पश्चिम बाजूचा लगत धारक हा हरिदास मारुती शिंदे म्हणणजेच प्रतिवादी हा आहे. सदर मोजणी अर्जमध्ये अर्जदाराने दिल्या प्रमाणे त्याचा पत्ता नमुद करण्यांत आलेला आहे. त्याचा पत्ता हा ऋणवाल बिल्डींगच्या मागे, मोहा रोड कळंब असा अर्जदाराने नमुद केलेला आहे. लगतच्या कास्तकारांना आमच्या कार्यालया मार्फत हस्ते नोटीसा तामील करण्यांत आलेल्या आहेत. सदरच्या नोटीसा श्री. ए.बी. शिंदे यांनी तामील केलेल्या आहेत. आमचे कार्यालयीन अभिलेखा प्रमाणे प्रतिवादी हरीदास याला पाठवण्यांत आलेली नोटीस ही पत्ता न सापडल्यामुळे परत आल्याचे दिसून येते.

४. मोजणीला जातांना मी मोजणीदाराचा अर्ज, सदर गटाचा टोच नकाशा, सदर गटाची ९/३,९/४ चे अभिलेखाची नक्कल, सदरचे गटाचे ७/१२ उता–याची नक्कल इत्यादी कागदपत्राची मुळ संचिका मी सोबत घेवून गेले होते. जायमोक्यावर प्रत्यक्ष धारकांच्या वहिवाटीची पाहणी केली. सर्वे क्रमांक ७ ची पाहणी केली. गट क्रमांक ७१ हा सर्वे क्रमांक ७ चा हिस्सा क्रमांक ३ चा तयार झालेला आहे. मोजणी करण्यांपूर्वी मी सर्वे क्रमांक ७ चे चारही बाजूचे बांधावर चुना लावलेले दगड निश्चीत केले त्यानंतर ईटीएस मशीनच्या सहाय्याने मोजणी केली. सर्वे क्रमांक ७ ची मोजणी केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की सर्वे क्रमांक ७ मध्ये हिस्सा क्रमांक ३ चे टिपणा प्रमाणे प्रमाणे मोजणी नकाशातील मापे जुळत नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, जमीन गट क्रमांक ७१ मधून पूर्व पश्चिम दिशेच्या बाजूने कळंब शिराढोण असा तिरपा रस्ता गेलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मोजणी नकाशा मध्ये सदर रस्त्याने व्याप्त केलेले क्षेत्र दर्शविण्यांत आलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर रस्त्याचे कोणत्या धारकाचे

किती क्षेत्र गेलेले आहे हे सुध्दा मोजणी नकाशात दर्शविण्यांत आलेले नाही.

५. ईटीएस मशीन ही मोजणी करण्यांपूर्वी गट क्रमांक ७१ च्या दक्षिण बाजूला वहिवाटीमध्ये लावण्यांत आली ज्या ठिकाणाहून चुना टाकलेले चारही पॉईट स्पष्टपणे दिसून येतील. सदर ईटीएस मशीनच्या सहाय्याने संपूर्ण सर्वे क्रमांक ७ ची मोजणी करण्यांत आली. सर्वे क्रमांक ७ चे पोटहिस्से मला सांगता येतील त्या सर्वे क्रमांकाचे एकुण पाच पोटहिस्से आहेत. ते सर्व पोटहिस्से मशीनच्या सहाय्याने मोजणी करण्यांत आलेले आहेत. पाच पोट हिश्याची मोजणी करण्यांत आली असे दर्शविणारा नकाशा तयार करण्यांत आलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे पाच पोटहिस्से रेशेने दाखवण्यांत आलेले नाहीत. साक्षीदार स्वतःहून सांगते की त्या पोटहिश्या बाबत नकाशात बिंदूने दर्शविण्यांत आलेले आहे.

६. हद्द निश्चीत करण्यांपूर्वी धारकांना व लगतचे कास्तकारांना नोटीस देण्यांत आली नव्हती. साक्षीदार स्वतःहून सांगते की, मोजणीच्या दिवशी जो पंचनामा तयार करण्यांत आला होता त्याच दिवशी हद्दी खुणा निश्चीत करण्यांची तारीख सर्वांना देण्यांत आली होती व त्यांना समज सुध्दा देण्यांत आली होती. हे म्हणणे खरे आहे की, मोजणी करण्यांपूर्वी जी नोटीस लगतच्या कास्तकारांना देण्यांत आली होती त्यामध्ये विश्रांत सोपान ओव्हाळ यांना नोटीस देण्यांत आली होती परंतु ती न बजावता परत आलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रत्यक्ष जायमोक्यावर न जाता कार्यालयातच बसून मोजणी नकाशा तयार केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर मोजणीत प्रतिवादीने गट क्रमांक ७१ वर ६ आर अतिक्रमण केले असल्याचे निश्चीत झाले हे मी खोटे कथन केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या सांगण्यांवरुन सदर मोजणी संदर्भात खोटा अभिलेख तयार केला असून आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

<u>उलटतपास पूर्ण</u>.

<u>फेरतपास नाही</u>.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.

Sd/-

दिनांक :- ०५/०२/२०२४.

**( आर. पी. बाठे )**

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कळंब.